महासागर अमरावती
गुरूवार दि. 19 सप्टेंबर 2024
पान 6

# पोस्टर फाडण्यावरून अचलपूरमध्ये दगडफेक

## सरमसपूरा ठाण्यावर धडकला जमाव

### दोन पोलीस शिपाई जखमी

### आरोपींना केली अटक




**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.18 )** - अतीसंवेदनशील अचलपूरात मंगळवारी गणेश विसर्जनाच्या दिवशी पोस्टर फाडण्यावरुन गांधी पुल परिसरात दोन गटात वाद झाला. त्यानंतर नजीकच्या पोलीस चौकीत हा वाद पोहोचल्यावर एका गटाने पोलिसांवरच तुफान दगडफेक केली, यामध्ये एका महिला पोलीस कर्मचाऱ्यासह दोन पोलीस शिपाई जखमी झाले.

पोलिसांनी सांगितले की, शहरातील ईद ए मिलादनंतर गणेश विसर्जन शांततेत पार पाडले जात असताना अब्बासपूरा येथील एका 17 वर्षीय तरुणाला टीपू सुल्तानचे पोस्टर फाडल्याचा आरोपाखाली पकडून त्याला मारहाण केली, त्याच्याकडे 1500 रुपये काढून घेतले आणि त्याला नजीकच्या पोलीस चौकीवर नेले. तेथील पोलिसांनी त्यांना सरमसपुरा पोलीस स्टेशनमध्ये जा, असे म्हटल्यावर मोहित खान, अंजू, अप्पू, जावेद, अन्वर व इतर 10-15 जणांनी पोलिसांशी वाद घातला आणि दगडफेकही केली. या दगडफेकीत पोलीस हवालदार सय्यद मकसूद रहमान आणि एक महिला पोलीस हवालदार जखमी झाले. त्यामुळे गांधीपूल परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर मंजूरपुरा येथे बॅनर फाडणाऱ्या आणि दगडफेक करणाऱ्या तरुणांचा पोलिसांनी शोध सुरू असताना पोलिसांवर जमावाकडून दगडफेक करण्यात आली.

याप्रकरणात सरकारी कामात अडथळा आणून जमाव जमवून दगडफेक करणाऱ्या 15 ते 20 जणांविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### 10 दिवसांपुर्वीही झाला होता वाद

घरासमोर लायटींग लावण्याच्या कारणाहून याच गटाने 10 दिवसांपुर्वीही गणपती मंडळातील युवकांशी वाद घातला होता. दरम्यान सरमसपूरा पोलिसांनी मध्यस्ती करुन यांचा आपसी समेट घालून दिला होता. त्यानंतर गणेशविसर्जनाच्या दिवशी त्यांनी पुन्हा वाद घातला.

### समाज माध्यमांवर अफवांचा बाजार

यावेळी अचलपूर आणि परतवाडा शहरात गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीवर दगडफेक झाल्याची अफवा पसरली होती. या अनुषंगाने सोशल मीडियावर पसरणाऱ्या अफवांकडे लक्ष देऊ नका, असे आवाहन पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी केले आहे.

### शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त

घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद, सहाय्यक पोलीस अधिकारी शुभम कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी व पथ्रोट, परतवाडा, अचलपूर, चांदूरबाजार, शिरजगाव येथील पोलीस ठाण्याचे अधिकारी यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळ गाठले. त्यानंतर अचलपूर शहरात पूर्ण शांतता असून, कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### पोस्टर राहीले कसे ?

गणेश विसर्जनादरम्यान सर्व पोस्टर, बनर्स काढण्याचे राज्य शासनाचे आदेश असताना हे पोस्टर वेळीच काढण्यात आले का नाही ? असाही प्रश्न येथे निर्माण होत आहे.

## गणपती विसर्जनाला गालबोट

# तीन तरुणांना पूर्णा नदीत जलसमाधी

### मृतकांमध्ये इसापूरच्या काका-पुतण्याचा समावेश ■ पुर्णानगर व खोलापूरमधील घटना



मयूर ठाकरे

अमोल ठाकरे

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर/खोलापूर, (दि.18 )** - सततच्या पावसामूळे तुडूंब भरलेल्या नदीमध्ये यंदा बेसावधपणे गणेश विसर्जन करणे धोक्याचे ठरले. अमरावती जिल्ह्यातील पुर्णानगर आणि खोलापूर येथे गणपती विसर्जनाला गालबोट लागले. गणेश विसर्जनादरम्यान तीन युवकांचा पुर्णा नदीत बुडून करुण अंत झाला. ही घटना 17 सप्टेंबर रोजी घडली.

पूर्णा नगर- येलकी पूर्णा या गावांना जोडणाऱ्या पुला जवळ काका अमोल ईश्वरधन ठाकरे (40) व पुतण्या मयूर गजानन ठाकरे (25, दोन्ही रा. इसापूर ता. अचलपूर) यांचा बुडून मृत्यू झाला. तर खोलापूर परिसरात राजेश संजय पवार (23, रा.खेळनागवे, दर्यापूर) यांचाही पुर्णा नदीच्या पात्रातच पाण्यात बुडून मृत्यू झाला.

अचलपूर तालुक्यातील इसापुर गावातील गणेश भक्ताने गणरायाची पूजा-अर्चना केली. त्यानंतर अमोल ईश्वरधर ठाकरे व मयूर गजानन ठाकरे यांनीही आपल्या घरच्या गणपतीसह गावातील घरगुती गणपती ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये एकत्रितरीत्या पूर्णानदी पात्रात विसर्जनासाठी नेले. दरम्यान सर्व जण आपल्या आपल्या पद्धतीने गणपती विसर्जनाचा विधी करत असताना अमोल व मयूर दोघेही नदीच्या खोलपात्रात उतरले. त्यांना पोहणे येत नसताना सुद्धा नदीपात्रात गेले. दरम्यान दोघेही पाण्याच्या प्रवाहामध्ये सापडले आणि वाहून गेल्याने एकच खळबळ उडाली. त्यानंतर दोघांचाही शोधाशोध सुरू झाली. अमोल ठाकरे हे इसापूर ग्रामपंचायतचा कर्मचारी होता, त्याला एक आठ वर्षाची मुलगी आहे. तसेच मयूर ठाकरे हा अंजनगाव सुर्जी येथे सहयोग या खाजगी बँकेत कार्यरत असल्याचे समजते.



### टाकळी पूर्णा नदीवर वाचविले एका युवकाचे प्राण

दर्यापूर तालुक्यातील पूर्णा नदीच्या काठावर असलेल्या टाकळी येथे गणेश विसर्जन केले जाते. टाकळी येथील गणेश विसर्जनादरम्यान दर्यापूर येथील अमित गजाननराव देवके हे सुद्धा तेथे उपस्थित होते. दरम्यान गणपती विसर्जनावेळी ते नदीच्या प्रवाहात वाहून जात होते. त्यांना जय बजरंग मंडळाच्या पदाधिकार्यांनी वाचविले. यावेळी टाकळी सरपंच टाले, लाखपुरी येथील लक्षेश्वर संस्थानचे अध्यक्ष राजा दहापुते व इतर कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी जीव वाचविणाऱ्या युवकाचा सत्कार केला.

### बुधवारी सापडले मृतदेह

सदर घटना मंगळवारी सायंकाळी सहा वाजता घडली. अमोल व मयुरचा शोध घेऊनही सापडले नाही. त्यानंतर आसेगाव पोलिसांकडून शोध पथकाला पाचारण करण्यात आले. शोध पथक 7 वाजता घटनास्थळी दाखल झाले, मात्र शोध मोहीम रात्र झाल्यामुळे होऊ शकली नाही. त्यामुळे शोध पथक बुधवारी सकाळी 7 वाजता घटनास्थळी दाखल झाले. अमोल व मयूरची शोधाशोध केली असता सकाळी आठ वाजता मयूरचा मृतदेह वातोंडा हिम्मतपुर दरम्यान सापडला, तर अमोलचे प्रेत 10.30 वाजता घटनास्थळापासूनच काही अंतरावर जवळच सापडले असल्याचे आसेगाव पोलिसांनी सांगितले. तसेच उत्तरणीय तपासणीसाठी अचलपूर येथे दोघांचेही मृतदेह पाठविले.अमोल व मयूर यांच्या मृत्यूची माहिती इसापूर गावात वार्यासारखी पसरताच सर्वत्र शोककळा पसरली. समाजमन सुन्न करणार्या या घटनेमुळे गावात एकच गर्दी झाली. त्यानंतर बुधवारी दुपारी शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार पार पडले.

# एमआयडीसीतील राम इंडस्ट्रीजला भीषण आग

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.18 )** - बडनेरा बायपास रोडवरील एमआयडीसी परिसर स्थित राम इंडस्ट्रीज या खाद्यतेल कंपनीच्या कारखान्याला बुधवारी सकाळी भीषण आग लागली. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. या घटनेच्या माहितीवरून महापालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळ गाठले. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न केले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी 12 वाहने आणि 35 रासायनिक फोम बंबांचा वापर करण्यात आला. या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती आहे.



बडनेरा रोडवरील जुन्या एमआयडीसीमध्ये राम इंडस्ट्रीजचा खाद्यतेलाचा कारखाना आहे. बुधवारी सकाळी सहाच्या सुमारास कारखान्यात आग लागली. कारखान्यात ज्वलनशील तेलाचा मोठा साठा असल्याने आगीने काही वेळातच उग्र रूप धारण केले. या कारखान्यात खाद्यतेलाचा साठा असल्याने आग पसरण्याचा धोका होता. सुरुवातीला एमआयडीसी परिसरात वीजपुरवठा खंडित करण्यात आला आणि नंतर उच्च दाबाच्या बंबांनी पाण्याचा मारा करण्यात आला. सकाळची वेळ असल्याने कामगार कारखान्यात पोहोचले नव्हते. त्यामुळे मोठी हानी टळली. आगीचे कारण अद्याप समजू शकले नाही.

# कॉंग्रेसच्या आक्रमक आंदोलनानंतर डॉ. अनिल बोंडेंविरुध्द गुन्हा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.18 )**- भाजपाचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या विरोधात केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध करीत कारवाई करण्याची जोरदार मागणी कॉंग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पोलीस आयुक्त कार्यालयात जाऊन आयुक्तांना घेराव घालत मागणी केली. त्यानंतर खासदार डॉ. अनिल बोंडेविरुध्द राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.

राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांचे बद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. त्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून बोंडे यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. डॉ. अनिल बोंडे यांनी कॉंग्रेसचे नेते तथा विरोधी पक्षनेते यांच्या संदर्भात प्रसिद्धी माध्यमांसमोर राहुल गांधी यांच्या जिभेला चटके दिले पाहिजे असे विधान केले. हे विधान अत्यंत आक्षेपार्ह आणि निंदनीय आहे. असे निवेदन करून समाजामध्ये राहुल गांधी यांचे बद्दल द्वेष निर्माण करून त्यांच्यावर लोकमानसातून हल्ला व्हावा याकरिता उद्युक्त करण्यात आले आहे. त्यामुळे देशाच्या विरोधी पक्ष नेत्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचा आरोप ॲड.यशोमती ठाकूर यांनी यावेळी केला. अशा पद्धतीने वक्तव्य करून समाजामध्ये तेढ निर्माण करणे आणि दंगली भडकवण्याचा बोंडे यांचा प्रयत्न असल्याचा आरोपही यावेळी कॉंग्रेसच्या नेत्यांनी केला. राहुल गांधी यांच्या जीवाला धोका निर्माण झाल्यामुळे तातडीने बोंडे यांना अटक करावी अशी मागणी यावेळी ॲड.ठाकूर यांनी केली. या मागणीची दखल घेऊन पोलीसानी अखेर डॉ अनिल बोंडे यांच्याविरोधात कलम 192, 351(2) आणि 356(2) अन्वये पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. यावेळी आ. ?ड.यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे, कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी मंत्री डॉ. सुनिल देशमुख, माजी आमदार विरेंद्र जगताप, माजी महापौर विलास इंगोले, प्रवक्ते मिलींद चिमोटे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



कारवाईच्या मागणीसाठी पोलीस आयुक्तालयात धडक

# बेवारस गायवर तीन तास शस्त्रक्रिया करुन वाचविले प्राण

### मृतावस्थेत निघाले वासरु

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.18 )** - अंजनगाव सुर्जी पंचायत समितीच्या परिसरात एका अवघडलेल्या बेवारस गायवर पंचायत समीती आवारातच पशुचिकीत्सकांनी तब्बल तीन ते चारा तास कठीण शस्त्रक्रिया करुन त्या तिच प्राण वाचविले. मात्र गायीच्या पोटात असलेले वासरु डॉक्टर वाचवू शकले नाही. ही शस्त्रक्रिया अनेकांनी मुठीत प्राण घेवून पाहीली.

पंचायत समीतीचे कार्यालयाच्या आवारात बेवारस गाय अवघडलेल्या परीस्थीतीत अस्वस्थ झाल्यामुळे सकाळपासूनच तडफडत होती. गायीला असह्य वेदना होत असल्याचे लक्षात येताच पंचायत समीतीत असलेल्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना व पशु चिकीत्सकांना कळविण्यात आले. पशुधन विकास अधिकारी डॉ. श्याम टाले, पशुधन पर्यवेक्षक डॉ.राजेश गाडगे, डॉ.जितेंद्र निचळ, डॉ.निलेश इंगळे, डॉ. नागसेन अभ्यंकर, डॉ.दीपमाला मेसरे यांनी कशाचीही वाट न पाहता लगेच पंचायत समीतीत धाव घेतली.



गणेश नगर येथील काही सहकारी पशुमीत्र प्रवीण उर्फ पींटू कोल्हे, मनीष र्चुहाटे, निलेश मानकर, उमेश चौखंडे, सुंदर कोल्हे, तुषार रोंघे यांनीही पंचायत समीतीचे आवार गाठले. गायीचे पोटातुन पाय बाहेर असलेले मृत व असलेले वासरु दिसुन आल्यावर पशु चिकीत्सकांनी सकाळी 10 वाजता पासुन दुपारचे 2 वाजेपर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा करत मृत वासरु बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. परंतु ते पोटातच फुगल्याने पशुचिकीत्सकांना काढण्यास अपयश आले.

### सिझर करण्याचा घेतला निर्णय

सर्व डॉक्टरांनी गाईच्या वेदना समजून घेतल्यावर सिझर (शस्त्रक्रिया) करुन मृत वासरु बाहेर काढण्याचा निर्णय घेतला. 3 वाजता शस्त्रक्रिया पार पाडत गाईच्या पोटातुन तब्बल 22 किलोहुन अधिक वजनाचे मृतावस्थेत असलेले वासरु बाहेर काढुन गाईचा जीव वाचविला. या सर्व घाडामोडीत गटविकास अधिकारी विनोद खेडकर व तालुका वैद्यकीय अधिकारी सुधीर डोंगरे तालुक्यातील पत्रकार अशोक पिंजरकर, रविद्र वानखडे, प्रविन बोके, उमेश काकड, गजेंद्र मंडलीक, सचीन अब्रुक, मनोज मेळे इत्यादींच्या सहकार्याने गायीला जिवदान मिळाले.



# ग्रामपंचायत कार्यालय वासणी बु.

## पंचायत समिती, अचलपूर, जि.अमरावती

## निविदा सुचना

ग्रामपंचायत कार्यालय वासणी बु., पंचायत समिती अचलपूर, जि.अमरावती. यांचे मार्फत खालील कामाची मोहोरबंद निविदा बी-1 प्रपत्रामध्ये जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांचे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा ग्रामपंचायत वासणी बु. येथून प्राप्त करुन निविदा बंद लिफाफा ग्रामपंचायत वासणी बु. येथे सादर कराव्यात.

| अ.क्र. | ग्रामपंचायत नाव | योजनेचे नाव | योजना | मंजूर रक्कम | निविदा फी | भरलेल्या निविदा स्विकरण्याचा दिनांक | निविदा उघडण्याची दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वासणी बु. | रस्ता व नाली बांधकाम करणे. | अ. जाती व नवबौद्ध घटक | ५,००,०००/- | ३०० रू. | १९-९-२०२४ ते २६-९-२०२४ | २७-९-२०२४ वेळ १२ वाजता |

टीप-

1.निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय वासणी बु., पंचायत समिती अचलपूर, जि.अमरावती यांचे कार्यालयात पहावयास मिळेल.

2. निविदा स्विकारण्याचे तसेच काही कारणास्तव रद्द करण्याचे अधिकारी सरपंच/सचिव यांनी राखून ठेवलेले आहेत.

3. निविदा ह्या दोन लिफाफे पद्धतीने सादर करावयाचे आहे.

४. कामाची बयाना रक्कम अंदाजित किमतीच्या 1 टक्का राहिल.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत कार्यालय वासणी बु.**
**पंचायत समिती अचलपूर जिल्हा अमरावती**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# पेट्रोलपंप दरोडा प्रकरणातील आरोपी जेरबंद

**वरुड ( दि.18 )** - वरूड येथील पेट्रोलपंप दरोडा प्रकरणातील आरोपींना तात्काळ जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखा व वरूड पोलीसांना यश मिळाले. मयुर राजकुमार ठाकरे (21), सुरज ऊर्फ सुधिर प्रभाकर घोरपडे (20) व डिग्या ऊर्फ दिगंबर श्यामराव राऊत (22, सर्व रा. रा. सुरळी. ता. वरूड) अशी अटकेतील आरोपींची नावे असून, त्यांचा एका फरार साथीदाराचा पोलिस शोध घेत आहे. वरूड हद्दीतील वरूड-कुरळी मार्गावर रामेश्वर नागदीवे (रा. वरूड) यांच्या मालकीचे इंडीयन आईलचे पेट्रोलपंप आहे. 17 सप्टेंबर रोजी मध्यरात्री अज्ञात पाच ते सहा जणांनी त्यांच्या पेट्रोलपंपाच्या कॅबिनमध्ये खिडकीतून प्रवेश केला आणि आतमध्ये झोपलेले पेट्रोलपंपावर काम करणार्या तीन कर्मचार्यांना मारहाण केली. त्यानंतर त्यांनी कर्मचार्यांचे हातपाय बांधुन तेथील लोखंडी कपाट तोडले आणि त्यातील 5 लाख 32 हजार 379 रुपयांची रोख लुटून नेली. त्यावेळी पोलिसांनी पेट्रोपंपवर काम करणारा प्रशिक सुभाष दंडाळे (26, रा. कुरळी) याची चौकशी केल्यानंतर, त्याच्या माहितीमध्ये तफावत आढळून आली. पेट्रोलपंपवरील कपाटातच असल्याची बाब पंपावर काम करणारा आरोपी प्रशिक दंदाळे याने हेरली होती. त्यामुळे त्याने व त्याच्या इतर चार साथीदारांनी संगणमताने कट रचुन हा गुन्हा केल्याचे पोलिस चौकशीत पुढे आले.

# पुढच्या वर्षी लवकर या...

## जड अंत: करणाने बाप्पांना निरोप | जिल्ह्यात गणेशविसर्जन पडले पार



महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.18 )**- गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या असं म्हणत जिल्हाभरात गणपती बाप्पाला जड अंत:करणाने निरोप देण्यात आला. शहरातील छत्री तलाव, वडाळी तलावासह वडाळी परिसरातील प्रथमेश तलावात गणपती बाप्पाच्या मूर्तीचं विसर्जन करण्यात आले. अनंत चतुर्दशीच्या मुहूर्तावर अमरावती शहरात मंगळवारी अनंत चतुर्दशीच्या पर्वावर दीड लाखांहून अधिक घरगुती गणपतींचं विसर्जन करण्यात आले. तसेच शहरातील छोट्या सार्वजनिक गणपती मंडळांच्या गणपतींचेही विसर्जन पार पडले. अमरावती शहराजवळील कोंडेश्वर तलाव, वलगाव येथील पेढी नदी आणि नांदगाव पेठ जवळील दातापाडी नदीत बाप्पाच्या मूर्तीचं विसर्जन करण्यात आले. तलाव परिसरात गर्दीला जाण्याची परवानगी दिली जात आहे, परंतु मूर्तीसह तलावामध्ये एक किंवा दोन व्यक्तींनाच प्रवेश दिला जातोय. बोटावर मोजण्याइतक्या घटना सोडल्या तर जिल्ह्याज गणेशविसर्जन शांततेत पार पडले.


### 23 सप्टेंबर पर्यंत विसर्जन

अमरावती पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणाऱ्या नऊ पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये एकूण 532 सार्वजनिक गणेशोत्सव मंडळात गणपती बाप्पाची स्थापना करण्यात आली. या सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना विसर्जनासाठी 17 सप्टेंबर ते 23 सप्टेंबर पर्यंत दिवस ठरवून देण्यात आला. अनंत चतुर्दशीला 176 मंडळातील गणपतीचं विसर्जन करण्यात आले, तर बुधवारी 148 , गुरुवारी 117, शुक्रवारी 62, शनिवारी 22, रविवारी 2 आणि सोमवारला शहरातील खापर्डे बगीचा परिसरातील विदर्भाचा राजा या सर्वात मोठ्या गणरायाचं विसर्जन अग्निशमन विभागाच्या विहिरीत होणार आहे.

अमरावती शहरातील घरगुती गणेपतींचं विसर्जन सर्वाधिक प्रमाणात छत्री तलावात केलं जातं. अमरावतीकडून भानखेडा, लालखेडा, मालखेड मोगरा, कठोरा गावाकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. अमरावती शहरालगत असलेल्या या गावातील ग्रामस्थांना गणपती विसर्जनामुळं बडनेरा व चांदूर रेल्वे मार्गानं अमरावतीला यावं लागत होतं. सकाळपासून गणपती विसर्जनाला सुरुवात झाली. छत्री तलाव, प्रथमेश तलाव, वडाळी तलाव येथं तगडा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. छत्री तलावाला पूर्णत: बॅरिकेट्स लावण्यात आले असून या ठिकाणी जमावाला पोलीस व महापालिका प्रशासनाकडून मार्गदर्शन करण्यात आले. तलावालगत गणपती विसर्जनासाठी केलेल्या मोठ्या खड्ड्यांपर्यंत पोहोचण्याकरिता एक मार्ग आणि निघण्याकरिता दुसऱ्या मार्गाची व्यवस्था करण्यात आली. शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मिरवणुकीदरम्यान गैरप्रकार होऊ नये, याची दक्षता म्हणून शहरातील सर्व मुख्य चौकांमध्ये पोलिसांचा बंदोबस्त तैनात आले.

### अंजनगाव बारीत भव्य मिरवणूक

**अंजनगाव बारी**- येथील सात सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेश मुर्तीचे विसर्जन उत्साह शांततेत पार पडले. यामध्ये लोकमान्य गणेशोत्सव मंडळ, न्यु आझाद गणेशोत्सव मंडळ, चंदनशेष गणेशोत्सव मंडळ या मंडळाच्या मिरवणुकीने सर्वाचे आकर्षणाचा विषय ठरल्या./विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गावातून जाताना मस्जिद चौक, नेहरु चौक, गांधी चौक, इंदिरा गांधी चौक गावातील मुख्य मार्गांवरून सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणरायांच्या मिरवणुका काढण्यात आल्या. ढोल, ताशे, डि.जे व लाऊडस्पिकरसह विविध वाद्यांचा मिरवणुकीमध्ये समावेश होता. अनंत चतुर्दशीच्या दिवशी रात्री उशीरापर्यंत (दि.17) गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात आले. गणेश विसर्जनाची मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी गणेश मंडळे नागरिकांचे सहकार्य लाभले. काढण्यात आलेल्या विसर्जन मिरवणुकीमध्ये तरुणाईसह ज्येष्ठांचाही उत्साह वाखाणण्यासारखा होता.



### दर्यापूरात जल्लोषात पार पडले गणेश विसर्जन

दर्यापूर शहरातील गणेश विसर्जनात ढोल ताशे, मोठा उत्साह, जल्लोष आणि आकर्षक मिरवणूक पहायला मिळाली. गणेश भक्तांनी बाप्पाला संपुर्ण जल्लोषात निरोप दिला.सकाळपासून घरगुती गणपती तसेच मानाचे गणपती विसर्जित करण्यात आले. यावेळी विसर्जनस्थळी अबावृध्दांसह सर्वांनीच हजेरी लावली. यावेळी निरोप घेतो देवा आता आज्ञा असावी अशी प्रतिक्रिया माजी नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते रामेश्वर चव्हाण, शिवनेरी वाडा संचालक युवा उद्योजक तेजस चव्हाण यांनी दिली.



# अचलपूर मध्ये ईद-ए-मिलादुन्नबीच्या औचित्यावर खीर वितरित



महासागर प्रतिनिधी

**अचलपूर, ( दि.18 )**- अचलपूर शहरात ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने मोठ्या उत्साह आणि धार्मिक भक्तीभावाने खीरचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी मोठ्या संगतीतील तरुणांनी निदा-ए-हक बियाबानी अरबी मदरशाच्या मुलांना आणि शहरातील नागरिकांना खीर वाटली. यावेळी खीर व्यतिरिक्त बूंदी, बादुशाही, लाडू आणि इतर मिठाईही विविध ठिकाणी वितरण करण्यात आले.

खीर वितरणाच्या या उपक्रमात स्थानिक तरुणांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. यात पत्रकार मोहम्मद अजहरूद्दीन, सैयद असलम, फजल खान, ओवैस खान, शेख रेहान, शेख कैफ, शेख जुनेद, नासिर खान, सोहेल खान, शेख नवेद, जफर खान, युनुस खान, फैजान खान यांच्यासह अनेक तरुणांनी मुलांना खीर वितरित केली. ईद-ए-मिलादुन्नबीच्या प्रसंगी शहरातील बियाबानी मशिदीपासून अरबी मदरशाच्या मुलांचा मिरवणूकही काढण्यात आली. या मिरवणुकीचे नेतृत्व मशिदीचे इमाम शहजाद नूरी यांनी केले. त्यांनी या प्रसंगी पैगंबर मोहम्मद यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. मिरवणूक बियाबानी मशिदीपासून सुरू होऊन बिलनपुरा, अब्दलपुरा, मोठी संगत, जुन्या बस स्टँडमार्गे परत बियाबानी मशिदीपर्यंत आली.



या वेळी मास्टर नईम साहेब, अमजद अली, मन्नान खान, मोसिन खान यांच्यासह अनेक मान्यवर आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाने शहरात परस्पर भातृत्व आणि सौहार्दाचा संदेश पसरवला गेला.

# स्वच्छता मोहिमेत सर्व विभागांणी सहभागी व्हावे- जिल्हाधिकारी

स्वच्छता ही सेवा 2024
14 सितम्बर - 2 अक्टूबर 2024
स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता

महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.18 )**- स्वच्छता ही सेवा 2024 अंतर्गत स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता या मोहिमेचा शुभारंभ 17 सप्टेंबर रोजी होणार आहे. 2 ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या मोहिमेत सर्व विभागांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.


जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात याबाबत आज बैठक घेण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रापं बाळासाहेब बायस, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक श्रीराम कुलकर्णी, गटविकास अधिकारी तसेच क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक श्रीराम कुलकर्णी यांनी संगणकीय सादरीकरणातून दैंनदिन उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. जिल्हाधिकारी म्हणाले, स्वच्छतेचे काम शासनाचा उपक्रम आहे म्हणून न करता कायम स्वरूपी करण्याचे नियोजन करावे. तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर विविधि विभागांची बैठक आयोजित करावी. या मोहिमेत सहभागी होण्यासाठी सर्वांना सूचना द्या. वेगवेगळे नाविण्यपूर्ण उपक्रम करावेत, त्याचबरोबर त्याचे छायाचित्र पोर्टलवर अपलोड करावेत.

### 897 ठिकाणी स्वच्छता मोहिम

मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहोपात्रा म्हणाले, जिल्ह्याच्या ग्रामीण क्षेत्रातील 897 ठिकाणे हि अतिशय अस्वच्छ असून ते सर्व स्पॉट अभियान काळात लोकसहभागातून स्वच्छ करण्यात येणार असून त्याचे सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे. सदर स्पॉट कायमस्वरूपी स्वच्छ रहावे या करिता ते दत्तक सुध्दा देण्यात येतील. स्वच्छतेकरिता सहकारी गृह संस्था, विद्यार्थी, शिक्षक, नागरिक, सामजिक संस्था या सर्वांना सहभागी करुन उपक्रम करावेत. सफाई कामगारांच्या कल्याणांसाठीच्या योजनाही राबवाव्यात, असे आवाहन केले.

# भुदान, ग्रामदान कायदे, हद्दपार करण्याचा घाट

## विदर्भ सुदान-ग्रामदान सहयोग समितीचा आक्षेप



महासागर प्रतिनिधी

**अंजनगाव बारी,( दि.18 )**- भुदान चळवळीचे प्रणेते विनोबा भावे यांच्या इच्छेनुसार भुदान जमीनीच्या वितरणाची व्यवस्था करणे अपेक्षित असताना सरकारी पातळीवर भुदान ग्रामदान कायदे रद्द करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहे, ही कृती भुदान भावनेला अनुकूल असणार नाही. असा आक्षेप विदर्भ भुदान-ग्रामदान सहयोग समितीने नोंदविला आहे.

### विनोबा भावेंच्या संकल्पनेलाच छेद

राज्यातील भुदान व ग्रामदान अधिनियमाअंतर्गत जमिनीच्या संदर्भात शासनाची भूमिका ठरवण्यासाठी मार्च 2016 मध्ये एक अभ्यास समिती गठीत करण्यात आली होती. या अभ्यास समितीला मदत करण्यासाठी अमरावती विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करण्यात आली आणि या उपसमितीने गेल्यावर्षी आपला अहवाल सादर केला. सध्या भुदान कायदा रद्द करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असुन त्या विनोबा भावे यांच्या संकल्पनेला छेद देणाऱ्या आहेत.असे विदर्भ भुदान ग्रामदान सहयोग समितीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. सदर अहवालात भुदान यज्ञ अधिनियम 1953 तसेच राज्याच्या उर्वरित भागात लागू असलेल्या भुदान विषयक व्यवस्था निरसित करण्यात शिफारस केली आहे. याबाबत कोणतीही कारणे देण्यात आली नाही. मध्यप्रदेशात भुदान यज्ञ कायदा रद्द झाला असला, तरी देशातील अनेक राज्यांत भुदान यज्ञ कायदे अस्तित्वात आहेत. एका राज्यात कायदा रद्द होणे, हे महाराष्ट्रातही तो रद्द करण्याचे कारण असु शकत नाही. असे मत विदर्भ भुदान ग्रामदान सहयोग समितीने नोंदवले आहे.

# मुरलीधर पिसे यांचे निधन

महासागर प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि. 18 )** - येथून जवळच असलेल्या अंबाडा येथील महाराष्ट्र शासनाचा दलित मित्र पुरस्कार प्राप्त मुरलीधर लक्ष्मणराव पिसे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय 73 वर्षे होते. त्यांचे पश्चात पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.



ते गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक होते. गावातील सर्व लोकांशी मनमिळावू स्वभावामुळे ते सर्व समाजात एकरूप दिसून येत होते. त्यांचे जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.


## जन्म/मृत्यू बाबत जाहीर सुचना

**डॉ. संजय श्रीराम गरकल तहसीलदार, अचलपूर यांचे कोर्ट**

**प्रकरण क्रमांक : जन्म/मृत्यू नोंद क्र. २८/ एम.आर.सी.-८१/ वासणी बु./२०२४-२०२५**

**अर्जदार :**- लिखीता नामदेव ठाकरे रा. वासणी बु.ता. अचलपूर जि. अचलपूर

**विरूद्ध**

**गैरअर्जदार :**- सचिव ग्रामपंचायत कार्यालय, वासणी बु. ता. अचलपूर जि. अमरावती

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार लिखीता नामदेव ठाकरे रा. वासणी बु. ता. अचलपूर जि. अमरावती यांनी जन्म/मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये लिखीता नामदेव ठाकरे यांचा जन्म दिनांक १०.०५.१९६९ रोजी वासणी बु. येथे झाला. तरी ग्रामपंचायत वासणी बु. येथे जन्माची नोंद होणेबाबतचा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत तहसील कार्यालय, अचलपूर येथे हजर राहावे. अन्यथा कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत/आक्षेप नाही असे गृहित धरून अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक - ०४/०९/२०२४

शिक्का

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, अचलपूर**

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे 'अब्दुल रफिक शेख बुऱ्हाण' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन -मौजे- बनोसा, नझूल प्लॉट क्रं. 3759, नझूल शीट क्रं. 49, लेआऊट प्लॉट क्रमांक 3, सर्वे क्रमांक 33/2, ता. दर्यापूर, जिल्हा. अमरावती.

चतु. सीमा : पूर्वे - लेआऊट रस्ता पश्चिम - सर्विस लाईन, उत्तर - लेआऊट प्लॉट क्रमांक 4, दक्षिण-रसूलशाह यांचा याच प्लॉट मधील भाग

सदर मिळकत माझे पक्षकार अब्दुल रफिक शेख बुर्हाण यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी SMFG INDIA HOME FINANCE COMPANY LTD. येथे कर्जाकरीता अर्ज केला असता. वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 03/07/2018 रोजीचे दस्त क्र. 1691 सदर दस्त गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय-नीमशासकीय-इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

**आपला**
**Advocate**
**रवींद्र र. वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो. नं. 9823698745**


# मेंढपाळ बांधवांना मुख्य प्रवाहात आणणे प्रथम उद्दिष्ट-आ. बच्चू कडू

## अचलपूर येथे भव्य मेळाव्याचे आयोजन | मेंढपाळ बांधवांनी बच्चू कडू यांचे पारंपरिक पद्धतीने केले स्वागत

महासागर प्रतिनिधी

**अचलपूर,( दि.18 )**- शेतकरी, शेतमजुरांप्रमाणेच मेंढपाळ बांधवांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. सरकारकडे आपण अनेकदा याबाबत पाठपुरावा केला त्याला काही प्रमाणात यश सुद्धा मिळाले मात्र आपल्या सर्व मेंढपाळ बांधवांना मुख्य प्रवाहात आणणे हे आपले प्रथम उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन बच्चू कडू यांनी केले. अचलपूर येथे प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने रविवारी मेंढपाळ बांधवांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यातआले होते. याप्रसंगी मुख्य मार्गदर्शक म्हणून ते मेंढपाळ बांधवांशी संवाद साधत होते.



ते पुढे बोलतांना म्हणाले की,शासनाच्या वतीने महाशेष योजनेचे अत्यल्प उद्दिष्ट असून हे उद्दिष्ट वाढविण्यासाठी आणि ही बाब शासनाच्या लक्षात आणून देण्यासाठी अधिकाधिक मेंढपाळ बांधवांचे महाशेष मध्ये अर्ज करण्याचे प्राथमिक कार्य या मेळाव्याच्या उद्देशाने करत असल्याचे ते म्हणाले.जेणेकरून शासनाला अर्ज आल्यानंतर राज्यात किती गरजू मेंढपाळ बांधव आहेत याची माहिती मिळेल आणि त्या अनुषंगाने महाशेष योजनेचे उद्दिष्ट वाढविण्यासाठी आमचे प्रयत्न असतील.राष्ट्रीय पशुधन विकास योजनेअंतर्गत सर्वप्रथम चांदुर बाजार तालुक्यात 35 प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यापैकी 21 प्रस्ताव मंजूर करण्यातआले असून त्यातील 21 प्रकल्प मजूर झाले असल्याची माहिती सुद्धा यावेळी आ. बच्चू कडू यांनी दिली.

अचलपूर येथील प्रहार पक्षाच्या कार्यालयात या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. संजय कावरे,जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पुरुषोत्तम सोळंके तथा तालुक्यातील सर्व पशु संवर्धन अधिकारी मार्गदर्शन करण्याकरता उपस्थित होते या मेळाव्यामध्ये एकाच छताखाली दहा वेगवेगळे योजनांकरीता शेतकऱ्यांकडून अर्ज भरण्यात आले. तथा ही प्रक्रिया दिनांक 26 सप्टेंबर पर्यंत सुरळीत राहील असे आयोजकांनी सांगितले. सध्या शेळ्यांमध्ये विविध रोगामुळे मोठ्या प्रमाणात पशुंच्या मरतुकी मुळे नुकसान होत आहे, त्याकरिता शासनाकडून मागील चार वर्षापासून मागणी असलेला लसींचा पुरवठा करण्यात यावा अशी मागणीही यादरम्यान करण्यात आली. परप्रांतीय मेंढ्या या चराई करता जिल्ह्यामध्ये येतात त्यांच्यासोबत भरपूर प्रकारच्या रोगराईसुध्दा येते. त्यांना कुठल्याही प्रकारची लस दिलेली नसल्याने स्थानिक जनावर हे विविध रोगांना बळी पडतात, दुसरीकडे स्थानिक जनावरांचा चारा संपवून आपल्या स्थानिक जनावरांना उपासमारीला समोर जावे लागते, त्यामुळे आमदार बच्चू कडू यांनी पथदर्शी असा निर्णय घ्यावा अशी मागणी मेंढपाळ बांधवांनी मेळाव्यात बोलून दाखवली. यावर आ.बच्चू कडू यांनी अधिकाऱ्यांना याबाबत निर्देश देत यावर तातडीने कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना दिल्या. या मेळाव्यात अचलपूर, अंजनगाव सुर्जी व चांदुर बाजार तालुक्यातील पाचशे पेक्षा अधिक मेंढपाळ बांधव उपस्थित होते.

मेंढपाळ बांधवांच्या समस्या शासनदरबारी मांडल्याबद्दल मेंढपाळ बांधवांच्या वतीने आ. बच्चू कडू यांचा मानाचा दुपट्टा व काठी घोंगडी देऊन पारंपरिक पद्धतीने सत्कार करण्यात आला.

### मेंढपाळ बांधवांसाठी अभ्यास दौरा

राज्यात तथा बाहेर राज्यामध्ये आधुनिक पद्धतीने शेळी व मेंढी पालन कशाप्रकारे केल्या जाते याकरिता मेंढपाळ बांधवांचा एक अभ्यास दौरा आयोजित करण्यात आलेला आहे.यामध्ये मेंढपाळ बांधवांचा एक गट तयार करून राज्यात व राज्या बाहेर अभ्यास दौरा करण्यात येईल. ज्यामुळे मेंढपाळ बांधवांना आधुनिक पद्धतीने शेळी मेंढी पालन कसे करण्यात येते याबाबत सर्व तांत्रिक माहिती मिळेल.

### बंदिस्त शेळी मेंढी फार्म उभारणार

अचलपूर येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची भरपूर जागा उपलब्ध असताना येथे मेंढपाळ बांधवांसाठी आदर्श असा बंदिस्त शेळी व मेंढी फार्म उभा करण्यात यावा अशी मागणी मेंढपाळ बांधवांच्या वतीने करण्यात आलेली आहे या मागणीला आ. बच्चू कडू यांनी समर्थन दर्शवत लवकरच याबाबत पाठपुरावा करून आदर्श असा बंदिस्त शेळी व मेंढी फार्म उभारण्यात येईल असे आश्वासन आ. बच्चू कडू यांनी दिले.